# डॉ. नितीन मोरे

# काही (च्या काही) कविता



# काही(च्या काही) कविता!

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# काही(च्या काही) कविता!

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

काही(च्या काही) कविता!.

कवी :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० एप्रिल २०२०


©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,(विनोद)
4. नाच जमूरे नाच,(विनोद)
5. अहम ब्रह्मास्मि, (विनोद)
6. मच्छर टाईम्स, (विनोद)
7. संवादोनी प्रकटावे (विनोद)
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास (पत्रे)
12. श्शिभ्रष्टाचार! (विनोद)
13. आधुनिक कहाण्या (विनोद)
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार (नाटक)
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा (विनोद)
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता (कविता)
19. व्यक्ती आणि कथा - ठेंग्यादादा.. पेद्रू.. अँड्र्यू इ.
20. प्रीतीची 'प्रेम'कथा (कादंबरी)
21. ऐसा ही होता है!
22. तोच चंद्रमा..
23. काही(च्या काही) कविता)








www.esahity.com

# डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांच्या लिंक्स

नाटके




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sandhisaadhoo_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/samvadoni_prakatave_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahh_nitin_more.pdf

इतर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/letters_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/na_ba_kavita_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vyaktikatha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/preetichi_premkatha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/toch_chnadrama__nitin_more.pdf





राग दरबारी
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा


डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता


डॉ. नितीन मोरे
संधी साधू



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या


डॉ. नितीन मोरे
केल्याने



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

काही (च्या काही) कवितांतील काही कविता

या इतर काही कवींच्या काही कवितांचे विडंबन आहे.

ज्या ज्या कवींच्या कवितांचे विडंबन करून या कविता लिहील्या

त्या सर्व ज्येष्ठ व श्रेष्ठ कवींना हे पुस्तक माफ़ीनाम्यासह अर्पण.

डॉ. नितीन मोरे

**डॉ. नितीन मोरे**



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे तेविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# काही(च्या काही) कविता!

# काही(च्या काही) कविता!

## अनुक्रमणिका


१ वात्रटिका: टीकेविना!

२ प्लीज!

३ कविता

४ कवी- कविपत्नी संवाद!

५ प्रेमदीवाणे

६ उडप्याच्या हॉटेलात

७ एक गाय एक बैल!

८ माझी लेखणी!

९ इडली डोश्याची कहाणी

१० एक काव्यमय भांडण

११ अपेक्षाभंग

१२ तुका म्हणे ॥

१३ प्रतिदेव

१४ इर्शाद?!

१५ आधुनिक बहिणाबाईच्या चारोळ्या

१६ पांढरे केस आणि हिरवी मने

१७ माझ्या लग्नाची bilingual पोयम

१८ पन्नाशीचे गाणे

१९ कधी वाटते...

२० पावसाचे गाणे

२१ भांडण!

२२ खल बत्त्याची खलबते!

२३ मारलेल्या डोळ्याची कविता!

२४ पोपटाचे गाणे

२५ एकदा अमेरिकेत..

२६ जंक.. जंक..!

२७ लोडशेडिंगची कविता

२८ गझल!

२९ आमच्या स्वामींचे मार्केटिंग!

३० मना सज्जना..

३१ खादाडी

३२ व्हॉटस्याप विद्यापीठ..

३३ मिका म्हणे..

३४ शिलेदार!

३५ तळे राखी..

३६ आड - नावे!

३७ नवरा बायको!

३८ मूषकागमन

३९ उंदराचे गाणे

४० काव्य दंगल!

४१ तारूण्य!

४२ इतकेच मला ते कळले..

४३ गतिमान कारभार!

४४ मानव चालिसा..

४५ आमचे गाव!

४६ साहेब!

४७ स्वप्न!

४८ जाहीरनामा

४९ अवघाचि संसार..

५० जुगलबंदी!

१

## वात्रटिका: टीकेविना!

टीकेविना रचू चला वात्रटिका
आज भरवावी कोणाची घटिका?

असू आम्ही सारे ऐसेच वात्रट
थोडेसे आगाऊ थोडेसे चावट

येणाऱ्या जाणाऱ्या कोणाचे ही पाय
ओढितो आनंदे आम्हा त्याचे काय

समजून आम्हा आम्हीच शहाणे
याची त्याची उगीच टर ती खेचणे

जिथे पाहू तिथे राज्य वात्रटांचे
दिसे कोणी त्याचे असे पाय खेचे

यावच्चंद्रदिवाकरौ आमुचे राज्यच

तोफा नि बंदुका त्याही अमच्याच

परिधान केला वेश विदूषकी बावळा

चेहऱ्याआड अंतरी पहा नाना कळा

भासे जग सारे खाली डोके वर पाय

उल्ट्या चष्म्यास अमुच्या त्याचे हो काय

लिहू वात्रटिका.. जगू वात्रटिका

कुणी निंदा, वंदा वा करो किती टीका!

## २

# प्लीज .. !

काय सांगू कसा आता

काळ हा कोठला

बघता बघता आज इथे

काळ असे गोठला

गोठलेल्या काळामध्ये

अर्थ असा साठला

बारकाईने शोधताना

अर्थ स्वतः गोठला

धीर गंभीर सिरियस

कविता करू पाहातो अशी

कल्पना चुकवित राही

जसा बैल मारितो ढुशी

हाय रे दैवा ! असा कसा

मेंदू आहे लाभला

गंभीर काही लिहू असा

का जमूच नये मामला?

म्हणूनी का येती

विदूषकीच कल्पना मना

घ्या जरा सांभाळूनी ..अन ..

प्लीज मला पंडित  म्हणा!

३

## कविता

का रे असला तू
दिसशी उदास
इथे न माशा
नाहीत डास
गायींना
घालूनिया घास
म्हणती आता
पुरे रे बास..

ही असली का
कविता असते?
खरी कविता
आतून उमलते..

मग त्या ओळी
पहिल्या चार?
काव्य नव्हे
बस शब्द जुळार!

४

## कवि- कविपत्नी संवाद!

मी :

बघ सखये ।काय असा हा थाट

कल्पनांचा राजा मी। मी एक काव्य सम्राट

माझी बायको:

सोड सोड ती काव्य कविता। मी करेन थयथयाट

मी :

सांग प्रिये काय हवे तुज। चंद्र सूर्य तारका

हट्ट करीशी पुरविन मी। कितीही असो बारका

मा.बा.:

मारीशी नुसत्या बढाया। परवडतील का खारका?

मी :

गुंफतो मी काव्य सखये। मी असे ही तुझ्याच साठी

ऎक ऎक ही काव्य पुंजी । साठवितो मी तुझ्याच साठी

मा.बा. :

हे तू नव्हते सांगितले । लागता माझ्याच पाठी?

मी :

वेगळीच ती माझी दुनिया । काव्य माझे मजलाच प्यारे

सोडितो हे जग मी सारे । काव्य काव्य नि काव्य वारे

मा.बा.:

आण ते बाड आता । चुलीतही घालेन सारे

मी :

जे रविही नही देखे । तो मी कविराज असा

जाहलि कवि मी आता । सांग मी आननी कसा?

मा.बा. :

हाय माझी ही दशा । तुज आठवे की अवदसा

मी :

ऎक सखये सांगतो मी । माझ्या मनीचे गूज सारे

( मध्येच तोडत...)

मा.बा. :

ऎक तू मीच बोलेन । ऎक बोलाने बऱ्या

सांगते तुज गोष्टी । चार आता ह्या खऱ्या

बोलू नकोस काही कविता । घालायच्या का चुलीत

भाव ही त्या ना मिळे । विकुनिया या रद्दीत

लागलीसे भूक तुजला । चांदण्यांची बनवू भाजी

आण तारे बनविते चटणी मी । त्यांची ताजी

चंद्रपोळी खाऊनिया । होशीलना तूच तृप्त

कि चटके रविचे बसुनिया । होशिल गुप्त

मी :

ठीक सखये मोडीतो मी । हा काव्य संसार

नाही नाही बनत आता । मी भुईला भार

## ५

## प्रेमदीवाणे

दीवाणेच ते .. नाही सयाणे

उगाच गाती प्रेमतराणे

हे कसले ते प्रेम दीवाणे

तेल न तूप न हाती धुपाणे

कट्ट्यावरती करती लीला

करा बापडे ..

जोवर हात ना पीला

नाही भवसागर हा गंमत

ज्यातून जातील असेच तरंगत?

आटे दाल चा समजेल भाव

मग खातील

नुसताच वडापाव?

६

## उडप्याच्या हॉटेलात

इडली डोसा आणि उतप्पा

मारीत बसले एकदा गप्पा..

इडली होती गरम गरम

फुगलेली अन नरम नरम

डोसा होता मस्त पसरला

भाजी घालून पोटात तो बसला

उत्तप्पा तसा जाडच होता

कांदा मिरची पखरून होता

इडली म्हणे रे डोसाभाऊ

सांबारासंगे तुजला खाऊ

डोसा म्हणे इडली बाई

नको दाखवू असला तोरा ..

चटणी मध्ये बुडवताना

पाहिले तुला पोरी पोरां

वाटे गंमत उत्तप्पाला

म्हणतो इडली अन डोशाला

म्हणतो कसा, रे नका भांडू

आपण सारेच आंडू गुंडू

बुडणे सांबार अन चटणीत

हेच असते प्राक्तन आपले

तू काय नि मी काय

याहून आपले नशीब कुठले

इडली म्हणे खरेच उत्तप्पा

तुम्ही आमचे खरेच अप्पा

आपण सारे मजेत राहू..
उडीद तांदळाने बनत राहू

मी राहिन अशी फुगत
डोशाला नाही मी चिडवत

डोशा म्हणे उत्तप्पाभाऊ
खरेच भांडण विसरून जाऊ
तू मी अन इडलीबाई
उडप्याची शानच नाही?

तितक्यात तिकडून आला पळत
म्हणे मला होते कढईत तळत ..

उत्तप्पा म्हणे आपण विसरलो
या वड्यास आपण कसे ते भुललो ..

विसरू नका या मेदूवड्याला
तो ही भाऊबंदच आपला
चौघे आपण इथलेच आहोत
कोणी कसेही आपणा खावोत ..

आला तिकडून उडप्या आतून
आंडु गुंडू नार पुंडू ..म्हणे
इडली डोसा वडा उत्तप्पा
दडून बसती सगळी जणे!

७

## एक गाय एक बैल ..

एकदा एका गायीला
भेटला एक बैल
चल म्हणे फिरून येऊ
मैल दोन मैल
गाय म्हणाली चल येते
पण नाही नदीच्या पैल
तिथून येता येता होईल
कमरेचा काटा सैल
दोघे मग निघाले
करावयास सैर
रस्त्यावर वाघोबा
ज्यांच्याशी त्यांचे वैर
गाय म्हणे बैलासारखा बैल
तू का भितोस?
रोज कुठल्या डेयरीचे रे
दूध तू पितोस?
बैल म्हणे नाही ग..
तू असताना भीती कसली ..
वाघ येवो .. धावत सुटू
त्यात गंमत असली ..
गाय झाली अचंबित ..
म्हणे गंमत वाटे कसली ?
काही नाही गं.. माझ्या गाये ..
गोष्ट आहे असली
मला सांगू का..
भीती मजला नाही
धावायाचे तुझ्याहून फक्त
जलद मजला बाई!

८

## माझी लेखणी!

माझी लेखणी
जणू ..
सुंदर चकणी

माझे लेख
नकटीचा परफ्युम..
दिलफेक

माझी प्रतिभा अनवट
डोळा लागे ...
बदलू करवट

माझे काव्य
वाचा..वाचा..
करून दिव्य

माझे लिखाण
लिहिता लिहिता..
दाणादाण

माझे वाचक ..
ऐकून आहे ..
घेती पाचक!

९

## इडली डोश्याची कहाणी

एक इडली

फुल फुल फुलली

आपल्या घरातून बाहेर पडली

घर म्हणाले,

अगं थांब, नको जाऊस

इडली म्हणाली,

छे, मुळीच नाही

कारण

तू म्हणजे एक पात्र आहेस

तव्यावरचा

एक डोसा

म्हणाला मनाशी

चला,बाहेर फिरून येऊ

इथे फार म्हणजे

फारच गरम होतंय

काळजात नुस्तं चर्र होतंय.

मग इडली भेटली डोश्याला

म्हणाली,

अरे डोश्या,

फार भाजलं का रे तुला?

डोसा म्हणाला,छे गं,

याची सवय आहे मला.

पण एक सांग मला

तू बरी आहेस ना?

किती छान दिसतेस

पांढरी पांढरी पान,

पण जरा फुललेली का दिसतेस?

इडली म्हणाली,
डोश्या, किती रे काळजी माझी तुला
म्हणूनच तू आवडतोस मला.
वेळ साधून डोसा म्हणाला,
खरे सांगू?
मलाही तू आवडतेस.
मला सांगू काय वाटते?
इक इडली को देखा तो ऐसा लगा...
अगं इडल्ये
माझी होशील का?
इडली लाजली
चूर चूर लाजली
आणि फुललेली अजून फुलली

मग दोघे म्हणाले,
चला छान सेलिब्रेट करू
इकडे फिरले
तिकडे फिरले
इकडे हाऊसफुल्ल
तिकडे हाऊसफुल्ल

सगळीकडे गर्दीच गर्दी
इडली म्हणाली,
हाय ! ये जमाना बडा बेदर्दी
डोसा म्हणाला,
चल इडलिटल्ये
आपण उडप्याकडे जाऊ
बसून काही छान खाऊ

इडली डोसा
दोघे बसले
तसा वेटर म्हणाला,
क्या लाऊ साब?
गरमागरम मेदूवडा
और गरम शिरा उपमा
या मस्त व्हेज समोसा?
डोसा म्हणाला,
वेटर भाव,
कान तुम्हारा इधर लाव
नको वडा, नको समोसा
दे फक्त जरा आडोसा

वेटर म्हणाला,

डोसा भाय,

तुम हमारा मेहमान हाय

तुम और इडलीवैनी बाय

आजसे इदरीच रैनेका

दोनो मिलके रैनेका

मग इडली आणि डोसा

आणि डोश्याचे अप्पा उत्तपा

उडप्याकडे लागले राहू

तेव्हा पासून उडिपी

घाली सर्वांना

इडलीडोसाउत्तपा खाऊ !

## १०

## एक काव्यमय भांडण

नवरा :

हम हूं हजबंड सीधा सादा

करू नको तू राडा

चालतो नाका समोर

पण नाकच थोडा तेढा

बायको :

ये ठोकून करते सीधा

जो नाक जरा तेढा

तू कसला सीधा सादा

वाटतो अर्धा वेडा

नवरा :

हम हूंच हजबंड सीधा सादा

समजू नको तू वेडा

इतका पण नाही मूर्ख

की येडा बनके खाऊ पेढा

बायको :

कसला हजबंड सीधा सादा

न दागिना न साडी करतोस सिर्फ वादा

नवरा :

हम हू हजबंड सीधा सादा

माझ्या चुकांचा वाची पाढा

शादी करके समझ पीछले

जनम का कर्ज मैंने फेडा

बायको :

समजून घे तू इतके तू खल मी बत्ता

वाटेन मिऱ्या  डोक्यावर तू पाटा मी वरवंटा

नवरा :

तू राणी घरची माझ्या

म्हणजे नाही का मी राजा

साऱ्या प्रजेवर चाले

बघ हुकूम चाले माझा

बायको :

मी राणी असले तरीही नाहीस तू राजा

बोल कितीही तरीही फायनल वर्ड माझा

## ११

## अपेक्षाभंग!

हरभऱ्यावर मस्त चढून होतो
खुशीची मनी गाजरे खात होतो

मिळेल असा छानसा प्रसाद
अपेक्षा माझी जणू का प्रमाद

भात बोलाचाच कढी ही बोलाची
वांगी पुराणातील पोळी चापटीची

हाती येई असा भ्रमाचा भोपळा
देऊन कोहळा काढिला आवळा

म्हणालो बरीच हौस झाली पुरी
पळ जा देऊन हातावरती तुरी

## १२

## तुका म्हणे ॥

तुका म्हणे असतो । आजच्या युगात
व्हॉट्स्याप, फेसबुकवर । असती लिहिली गाथा ॥

झाले असते आमचे । लक्ष फॉलोअर
लक्ष स्मायली । अन लाखांनी लाइक्स ॥

हजारो झाल्या । असत्या कमेंट
म्हणती समस्त । तुका तुस्सी ग्रेट ॥

शिवाजी महाराज । पाठविता गिफ्ट
अनलाइक सत्वर । असते त्यांस मी केले ॥

पाहोनिया आमचे । लाखांनी लाइक्स
चांगदेवाची हिंमत । नसती झाली ॥

बुडालीच नसती । गाथा जर आमची
तरण्याचा मुळी । प्रश्नच नसता ॥

## १३

## प्रतिदेव

काय सांगू तुका । झाला असा माका
प्रसंग तो बाका । गुदरला ॥

चालत होतो । रस्त्याने मी जेव्हा
घडले ते तेव्हा । आक्रित ॥

घडले इतुके । न सांगावे कवतिके
प्रसंगास मौक्तिके । नाही म्हणू ॥

भेटला मजला । विठ्ठल तेधवा
पण पंढरीचा । नव्हे तो राया ॥

आमुच्या गल्लीत । विठ्ठल तो दादा
नाही सीधा साधा । दुष्ट अति ॥

गल्लीगल्लीत असा । असतो बदनाम
विठुरायाचे नाम । जरी त्याचे ॥

म्हणतो मजला । ऐसेवैसे ना करावे

आज्ञा त्याची। जैसी देववाणी?

करीन बापडा।  मी तरी काय
दादाचेच ऐकेन। दीनपणे॥

गल्लीतला गुंडच। न तो असे ऐसा
आता थोर थोर नेताही। बनू पाहे॥

त्याच्या त्या शब्दास। आगळे वजन
कोणीच सज्जन। नाकारी कैसे॥

ऐसा हा विठ्ठल। भेटे तो रस्त्यात
हाती त्याच्या झेंडा। कुठलासा॥

झाले झाले वाल्याचे। वाल्मिकीकरण
कुण्या पक्षाची वळचण । तेथे उभा॥

विठुराया असे। भले खरा देव
आता हा प्रतिदेव। इथला विठ्ठल॥

हीच परिस्थिती। हीच वस्तुस्थिती
गुंग होई मती। तुका म्हणे॥

१४

## इर्शाद?!

एका अशा
बेसावध क्षणी
ऐकव कविता
म्हणताच कुणी

कवि नुसता
चेकाळून उठतो
बाड कवितांचे
उघडून बसतो
एका मागून एक कविता
मग नुसताच ऐकवित सुटतो.

ऐकणाऱ्यास असो की न इच्छा
कविराज न सोडिती पिच्छा

एक इशारा देतो म्हणूनच
ऐकव कविता कधी म्हणू नका
स्व हस्ते कुणी स्व पायावर
धोंडा अपुल्या टाकू नका.

१५

## आधुनिक बहिणाबाईच्या चारोळया

१.

अरे अजब ते मन

त्याचे आगळे तंतर

ओबामा नि ओसामात

एक अक्षर अंतर

२.

अरे अजब जीवन

एक अजय दुस्रा अमर

एका माऊलीची पोरे

एक पोलिस एक चोर

३.

अरे नोकरी नोकरी

ट्रेनवरी लटकली

चुके गाडी सेकंदाने

आता माझी सटकली

४.

अशी बदलली दुनिया

मोठे कोंदण हिऱ्याहून

बनवे दोन मिन्टांत मॅगी

तिला म्हणती सुगरण

५.

अशी कशी दुनिया

किती बरे बदलली

झाली प्रगती प्रगती

तरी पहिल्या सारखी

## १६

# पांढरे केस आणि हिरवी मने

आरश्यात पाहताना
आज दिसे एक केस पांढरा
एक पाहता दिसतो दुसरा
दुसऱ्या नंतर आणिक तिसरा !
दिवस चालले असे भराभर
काळ्यामधुनी कश्या चमकती
हाय ! अशा त्या चांदीच्या तारा !

काय गड्या ! हे कसे जाहले
दिवस कसे हे सरू लागले?

हात फिरवूनी टकलावरती
म्हणे असा तो मित्र सवंगडी
काळ न थांबे कोणासाठी
एकच सत्य ते सर्वांसाठी

मना ना पटे मना ना रुचे
गल्लीतल्या पोरांचा
हाय कसा मी झालो अंकल
रस्त्यावरती मित्र भेटला
पडले त्याला पूर्णच टक्कल

दिवस उगवला दिवस उलटला
काळ्यामधुनी येईल पांढर
केस पांढरे मन ते हिरवे
या प्रश्नावर एकच उत्तर !

१७

## माझ्या लग्नाची bilingual पोयम

बोहल्यावरती
उभा मी होतो
other side
ला उभी ती
मध्ये आमुच्या
curtain होता
आणि people
अवतीभवती

Priest shouting
जोरजोरात
चंद्रबळं नि ताराबळं
म्हटले मी किती
terribleम
आता life भरची
तारांबळम!

## १८

## पन्नाशीचे गाणे

आली जरी पन्नाशी

शाबूत आहे बत्ताशी

डोक्यावरती झळके टक्कल

बायको तरीही काढी अक्कल

म्हणते आता तरी सीरीयस हो

सारे हसती तू जोकर माझा घो

मी म्हणतो, what‘s in the age?

Why get arrested in that cage?

Isn't 50 a number just?

Be serious only if you must.

१९

## कधी वाटते...

कधी वाटते बनून मच्छर
गूं गूं करूनी उडत रहावे
कधी बनूनी माशी काळी
खाद्य पदार्थांवर विहरावे

कधी बनूनी ढेकूण बिकूण
गाद्यागिरद्यांवर लोळावे
बनूनी चिलटे उगीच आपले
दिव्यादिव्यांवर झेपावे

पाल बनूनी गोरी गोरी
भिंती भिंतींवर लटकावे
कधी बनूनी मूषकराजा
खुडबुड खुडबुड करीत सुटावे

का कवीकवींना पक्षी फुलांचे
आकर्षणच ते सदा असावे
कृमीकीटकांनी मारिले घोडे
का यांच्या सम कुणी न व्हावे?

बनूनी मुंगळा काळा काळा
गूळ ढेपींवर चिटकून रहावे
मुंगी बनूनी लाल लाल अन
साखर दाणे खात रहावे

कधी बनूनी झुरळबिरळ
कान्याकोपऱ्यांतून फिरावे
बनूनी कुठले कीटक कृमी
मानव जातीस खूप चिडवावे

हे पडती का आकाशातूनी
सुंदर सारे निसर्ग घडवे
सारी एकच देवाची बाळे
का यांना ते कमी लेखावे?

## २०

## पावसाचे गाणे

उंदरी म्हणे उंदराला,

बाहेर पडतो धो धो पाऊस

राजा आज नको रे जाऊस

रहा घरीच दे थोडे डोके खाऊस

उंदीर आपला चक्रावून पाहतो,

बाहेर पडता भिजून जातो

घरात बसता थिजून जातो

कारण सांगू का काही खोटे

पण काय करू नि जाऊ कोठे

हे संकटच मजला वाटे मोठे

उंदीरमामा असा धडपडे

आड इकडे अन विहीर तिकडे

## २१

## भांडण !

एकदा आमचे झाले
जोरदार भांडण
भांडण कसले
जणू रणकंदन

मित्र माझा आला सोडवाया
म्हणाला,
वहिनी तुमचे सत्य आहे
बोलण्यात तुमच्या तथ्य आहे

मी चिडलो
म्हणालो,
उंदराला मांजर साक्ष
ही म्हणाली तसे नाही
कोल्ह्याला आंबट द्राक्षं

मित्र माझा
खरे तर खास आहे
खऱ्याची त्याला
मला वाटायचे
खरे तर आस आहे

म्हणून त्याला बोलावले
पण त्यानेच मला
कसे ठकवले

मी म्हटले
दोस्त दोस्त ना रहा
जाऊ दे झाले
दुसरीकडे जरा पहा

संपले झाले भांडण

संपले कसले, संपवले झाले

आपली बाजू हरण्याची

वेळ सत्य जाणण्याची

एकदम झालो चिडिचूप

बसलो गप्प म्हणून

मित्र माझा.. मित्र कसला..

तो ही गेला निघून

आता खरी शामत

डोळयांच्या कोनातून

होतो पाहत

पाणीच पाणी तिच्या नयनात

आसवांनी जणू होती ती नहात

पण

आळी मिळी गुप्प चिळळी

अबोलाही नाही सोडवत

फुगलेल्या गालांनी

सुजल्या डोळयांनी

बसलेली ती..

खरे सांगतो.. हलले

काही काळजात ही

कशाला बोललो मी

शब्द ते तसले

शब्द कसले

शस्त्र ते सगळे

वाहला राग

आसवांनी चार

मनवू राणीला

सायास असू दे फार

बोललो मी तिला

सॉरी गं राणी

नकोस गं आणू

नयनात पाणी

राणीचा हुंदका
थांबला गळ्यात
नको रे म्हणाली
पडून गळ्यात

तुझी होती चूक
बाब ही खरीच
पण रे अबोला
नको ना धरूस

असला अबोला
जीवघेणा तू धरीशी
सांग तू भांडावे
पुढे मी कोणाशी ..?

## २२

# खल बत्त्याची खलबते!

खल नि बत्ता almost extinct होत चाललेत, समजा वीज गेलीय नि मिक्सर बंद! मग ही बत्ता नि खल यांची खलबतं!

प्रिय सख्या

आज खूप वर्षांनी तुला भेटणार
आपल्या जुन्या आठवणींचे खोबरं
हाताला रग लागेपर्यंत कुटणार
कित्ती मज्जा केली नै आपण ,
अस दर पाच मिनीटानी म्हणणार

मग मी खोबरं नि दाणे
दाणदाण कुटणार
असं वाटत असतानाच,
खोबऱ्याच्या तोबऱ्यानी
कोणी तोंडच बंद केलं
काय बोलणार?

आणि आज अचानक भेटल्यावर
मी तुझ्या बुडावर, नि तुझ्या आतल्या
कडांवरील खोबऱ्यावर
नि दाण्यांवर प्रहार करणार
तो ही नाही रे पुरा
राहिलो झाले सुटासुटा

आठवतं? मिक्सर आला तेव्हा
ठेवताना माळयावर आपल्याला
कमीत कमी खलाबरोबर
राहण्याचा माझा आटापिटा

काळाचा महिमा सख्या

आपण काय करू शकतो

आपल्या सारखंच भेटव एकदा

पाटा नि वरवंट्याला

अशी प्रार्थना 'त्याला' करु शकतो

२३

## मारलेल्या डोळयाची कविता!

तुझे ते डोळे दोन
जुल्मी
मारताना पाहिले होते
मी तुला
वयाची लाज लज्जा
न बाळगता..
नि ते करताना
दुनियेने पाहिले..
नव्हते तुला दु:ख कसले
न शरम .. न हया ..
एका डॉक्टरकडे झाली
होती आपली भेट
होते तेव्हा झालेले लोडशेडिंग..
सगळीकडे होता अंधार ..
तू आला होतास हातात
घेऊन इमर्जन्सी लाईट
झाले होते तेव्हाच तूफान
आणि
तुझे त्या लायटाच्या प्रकाशात
झटकन डोळे मारणे
तू तोच तो ..
अंधारात डोळा मारणारा
मला एकच आहे उत्सुकता..
तू असा कसा रे इतका ..
बिनधास्त नि निलाजरा ..

२४

## पोपटाचे गाणे

एके दिवशी संध्याकाळी
बायको म्हणाली नवऱ्याला
ऐका ना गडे,
सेल साड्यांचा
चालू तिकडे..
स्वस्तात आहेत तर
चार पाच
घेऊन टाकू
खास खास.
नवऱ्यास कोण जाणे काय झाले
अंगात त्याच्या काय संचारले
त्याच्या तोंडून शब्द आले,
'किती साड्या गं तुझ्याकडे
कपाटे भरून
जातो तुझा वॉर्डोब
कपड्यांनी ओसंडून
नुसते उघडता दार येती
अंगावर पडून'

मग काय होणार?
ठिणगी पडली तर
आगच भडकणार
नवऱ्याला वाटले मागावी माफी
'सॉरी बाई, चूक झाली जराशी
पुन्हा नाही करणार चूक अशी
चुकून खरे बोललो मगाशी'
आता यावर तरी काय होणार?
नवऱ्याला वाटले
बसला जणू ज्वालामुखीपाशी

पिंजऱ्यातला पोपट
होता कान देऊन ऐकत
म्हणाला,
'गोविंदराव, माफी मागताय की
आगीत तेल ओतताय?'
गोविंदराव चिडले, म्हणाले,
'गप रे, पोपटा

तू कसा नुसता बसून असतोस
खातो, पितो आणि झोपतोस
जमेल तेव्हा जमेल तितकी
पोपटपंची करतोस
तुझी काय बाबा नुसतीच मजा
तुला काय ठाऊक संसाराची सजा'
पोपट म्हणाला,
'गोविंदराव,
अगदीच असे नाही राव
होती माझी पण एक पोपटीण
काढली आम्ही वर्षे तीन
होती छान, पण थोडी हट्टी
आणि जरा थोडी हट्टीकट्टी
एकदा मागितले तीन तीन गोफ
नाही म्हणालो, तर धडाडली तोफ
मीही भडकलो, तडकलो
मग निघालो, उडालो
बसलो आहे पिंजऱ्यात लपून
जगापासून दूर दडून'

गोविंदराव म्हणाले,
'तुला नाही वाटत उंच उडावे?
आकाशात मस्त रमावे
मग छान घरी यावे
पोपटीणीशी सूत जमावे'
पोपट म्हणाला,
'छॅ, छे, छॅ, छे ! गोविंदराव,
विसरलो ते मी सारे दिन
आता मस्त इकडॅच राहातो
या पिंजऱ्यावर राज्य करतो
या पिंजऱ्याचा मी राजा
नाही म्हणून काय कोणी प्रजा'
गोविंदराव म्हणाले,
'पोपटा, पोपटा,
खातोस ना पेरूची फोड
मग बोलावे की पोपटीणीशी गोड
भांडण काय कायमचे असते?
आणि त्यात पण एक गंमत असते
भांडण आहे spice of life
आता हे खरंय की हल्ली लाईफ
जरा जास्तच spicy होत चाललंय !'
पोपट म्हणाला,

'गोविंदराव, तुम्ही काही म्हणा
या पिंजऱ्यातही आहे मजा
या पिंजऱ्यापुरते स्वातंत्र्य आहे मला.'
म्हणाले मग गोविंदराव,
'ऎका तुम्ही पोपटराव,
हे नेहेमीच असे असते
आपण नेहमीच हरायचे असते
भांड भांड भांडायचे
पण मनाला थोडीच लावायचे?
माझे ऎक, विचार कर
आज ठेवतो दरवाजा उघडून
भुर्रकन रात्री जा उडून
पोपटीण वाट पाहात असेल
तुझ्यासाठी झुरत असेल.'

दुसऱ्या दिवशी सकाळ सकाळी
बायको उठली
उघडा पिंजरा पाहून म्हणाली,
'अहो, ऎकलंत का?
राघूला कोठे पाहिलंत का?'
डॊळॆ चोळत उठले गोविंदराव
म्हणाले, 'काय सांगतेस काय?
दरवाजा ठेवला उघडा कोणी?
चुकून राहिला का मुद्दाम कोणी?'
मग पुटपुटले,
'माझे म्हणणे पटले वाटते
पोपटीणीपाशी गेला वाटते.'
बायको म्हणाली,
'अहो काय बोलताय काय?
समजेल असे काही बोलाल काय?'
गोविंदराव म्हणाले,
'काही नाही गं,
म्हटलं,
तुझा तो सेल कधीपर्यंत आहे म्हणालीस?'

२५

## एकदा अमेरिकेत ..

तू तेव्हा दिसलीस
तर मी म्हणालो
कसली शिंकायचीस ग तू ..
तर तू म्हणालीस
शिंकायचीस नव्हे
शिंकतेस म्हण
बोलताना तुझ्या
नाकाडोळयांत आलेले पाणी
धूळ गेल्याचा बहाणा

करून तू पुसलेस खरे
पण खरं सांगू
अमेरिकेतल्या रस्त्यांवर धूळ नसते ग
आपल्या इथल्या सारखी

तेव्हा ते खरे ॲलर्जीचेच
होते ना गं?

२६

## जंक .. जंक .. !

जिलेबी आणि समोसा
वडा आणिक डोसा

सबवेत ब्रेकफास्ट ..
सीसीडीत डिनर लास्ट

बर्गर हॉट डॉग पिझ्झा
रोज खावा शिळा वा ताजा

असो राव किंवा रंक
नित्य स्वप्न खाऊ जंक

वेफर आणि कुरकुरे
तळूनच घ्यावे मुरमुरे

असावे फास्ट आपले फूड
हेल्दी नको, द्या जंकच गुड

एक एक डीप फ्राय
नवनवा करावा ट्राय

जंक फूड हाच मंत्र
नवयुगाचे हेच तंत्र

मॅक.. डॉमिनो ..पिझ्झा हट्..
नेहमीच धरावा त्यांचा हट्ट

लाइफ अमुचे असता फास्ट
विचार करणे दुरापास्त

सारे कसे जंकच जंक
फूड जंक..  विचार जंक

२७

# लोडशेडिंगची कविता

सखी मंद झाल्या तारका
तिकडे ही असणार लोडशेडिंग
बरे झाले आलो येथे घेऊन
बाडबिस्तरा आणि बेडिंग

आठवते नुकतेच आपले
धूमधामसे झाले वेडिंग
हेच हॉटेल होते ज्याचे
होते निव्वळ ए ग्रेडिंग

या निर्जनशा स्थळी
आलो समजून मस्त फीलिंग
माहिती नव्हते मला ग डार्लिंग
पडिक असेल  इथली बिल्डिंग

कसला हनि नि मून कसला
पडलो आभाळाला फेसिंग
वाट पाहू सकाळची गं
तोवर वापर हेच बेडिंग

सुंदर आहे ना रात्र आणिक
सुंदर वाटे हे स्टार गेझिंग
नसेल कोणी असले केले
अॅडवेन्चरस हनीमून सेलिंग

पण हाय ..सखी झाल्या मंद
तारकाही .. व्हाय ? आस्किंग
एकच कारण सगळीकडे गं
जिकडे तिकडे लोडशेडिंग

## गझल!

वाऱ्यावरी तुझे ते उडती कसे ते केस
गुंतून त्यात गेलो अन life is a mess

ऐकून बोल तुझे ते गोड गोड सारे
वाटे आणू तुझ्यास्तव ते चंद्र सूर्य तारे

म्हटले तुला तसे मी ऐटीत मी ही मारे
कळले परंतु नंतर नखरे तुझे ते सारे

होती नवी नवेली कौतुक मज भारी
कल्पनाच नव्हती पडशील मग तू भारी

पुरवित हट्ट तुझिया मी वाहुनियाच गेलो
वाटे आताच अर्धामुर्धाच मी ही मेलो

उमटे हृदयातूनी हे ते सर्व जग ते पाही
गझल नसे ही माझी गाणे मुळीच नाही

## २९

# आमच्या स्वामींचे मार्केटिंग!

उपदेश आमुच्या स्वामीजींचा
काही करा पण अव्हेरू नका
करा काहीही परंतु त्यांच्या
पाया पडण्या विसरू नका

असती कितीतरी भोंदू बाबा
त्यांच्यामागे धावू नका
कितीही केले संमोहित तरी
इतरांना तुम्ही बधू नका

असे असती स्वामीजी आमचे
समर्थ कधीही विस्मरू नका
न घ्या पंगा बांधा गंडा
घ्या वसा अन उतूमातू नका

साऱ्या जगती वाजे डंका
उगाच शंका घेऊ नका
जग सारे चालते तयामुळे
यावरही शंका घेऊ नका

काय सांगू तुम्हास महती
कमी त्यांना तुम्ही समजू नका
महावीरांतच  त्यांची गणती
इकडे तिकडे बघू नका

एकच एक हो सिद्ध पुरूष ते
मनुष्य त्यांना समजू नका
अवतार भगवंताचे असती ते
त्यांच्याशी पंगा घेऊ नका

स्वामीजी आमुचे अति दयाळू
अति ममताळू अति कृपाळू

न माना त्यांना तर होई काय

कल्पनाही त्याची करू नका

करा नमन वंदा चरण

अनमान किंचितही करू नका

उगाच घेऊन विष परीक्षा

जीव धोक्यात घालू नका!

३०

## मना सज्जना..

मना सज्जना भक्ती पंथेची जावे
तिथे ट्रॅफिक जाम अजिबात नोहे
जगात काय काय ॲडजेस्ट्मेंटे
विचारी मना तूच शोधून पाहे

सुभाषिते ती शिकविती सारे
आइकुनी मोरूची मुंडी ही हाले
शोधितो ऐसे कुठे होई जेथे
सदा सत्य बोले यथा तथ्य चाले

परिश्रमास कठोर न पर्याय जेथे
शोधून काढी शॉर्टकट्स तेथे
धनलालसा न असते पर्याप्त येथे
कंजूस म्हणवून घ्यावे तयाते

सदा वाद संवाद असो हितकारी

परंतु दिसे येथ गुद्दे अन वादावादी
मना असती सद्गुण संयमादि
विचारी कुठे लपती तत्ववादी

सदा विचार करी इतरां करिते
आपला तो बाब्या दुसऱ्याचे कार्टे
उपदेश करण्या इथे सुख वाटे
कोरड्या पाषाणां इथे मूल्य मोठे

लवकर निजे अन लवकर उठे
तया नित्य दूध अन पेपरवाला भेटे
हे सृष्टीचे कौतुक जाणून येथे
बाळाची ट्यूबलाइट लख्ख पेटे

## ३१

# खादाडी

इडली चटणी मिसळ पाव
वडा सांबार उसळ पाव
चला चला रे मारू ताव
समोसा आणिक वडा नि पाव

जिलबी इमरती गुलाबजाम
रसगुल्ले पाकात घोळून जाम
रसमलाई बासुंदी मालपुआ तमाम
रक्त शर्करा करो सलाम

वडा समोसा पुरी कचोरी
खावी बिनधास्त नाही चोरी
ढोकळा अळूवडी आणिक घारी
आवडे त्यात फरसाण भारी

श्रीखंड आम्रखंड पुरणाची पोळी
ज्याचे खाऊन वाजवू टाळी
ओरपू आमटी पळी न पळी
लावू सुखे ब्रह्म आनंदी टाळी

शेवपुरी भेळ आणि पाणीपुरी
रगडा पॅटिस आणि खारीपुरी
मसाल्याने ये नाका सुरसुरी
करू खादाडी.. अन हौस पुरी

खाऊ  तूपकट खाऊ तळकट
भरूपेट..भरपेट..अरबट चरबट
गोड नि तिखट ... खारट .. आंबट
चोचले जिभेचे पुरवू 'चव'पट

## ३२

## व्हॉट्स्याप विद्यापीठ..

शिकून घ्या हो सारे नीट

पुढे व्हा बनून धीट..

हे आहे व्हॉटस्याप विद्यापीठ..

शिकून घ्या राजकारण

शिका नि शिकवा समाजकारण

बघता बघता समाज प्रबोधन

करून टाका सगळे नीट

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

ह्याला उडवा त्याला बुडवा

त्याला बडवा जो जाई आडवा

शिकवून टाका धडा ही त्याला

जन्मभराचा नीट

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

उचला तळी एखाद्याची

गठडी वाळूनी विरोधकाची

उभा आडवा बदडून काढा

उखडून टाका वीट

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

खाऊ पोळी , वाजवू टाळी

आज याची , उद्या त्याची पाळी

आळीपाळीने तळी उचलूया

पकडून घट्ट ती सीट

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

कुणी न येथे छोटा.. मोठा

कुणा न असावी अशी पात्रता

मतामतांची खुशाल टाका

विचार न करता पिंक

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

असो बातमी असेल अफवा

कुणा न समजे कशी तेधवा

पोहोचे इकडून तिकडे क्षणार्धा

गाऊ तिचेही गीत

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

खरेपणाचे नकोच बंधन

मतास तुमच्या न घाला कुंपण

वाद असो संवाद असू दे, घाला इंधन

व्हा पुढे बनूनी धीट

हे तर व्हॉट्स्याप विद्यापीठ..

## ३३

# मिका म्हणे ..

आधी सांगे मग ना करी । तोचि असे व्यवहारी
दिन रात बढाया मारी । मिका म्हणे ॥

चाले तैसाचि बोले राजा । त्यासीच चतुर समजा
मारा फुकाच्या गमजा । मिका म्हणे ॥

बोलाचीच कढी आणि । उकरे बोलाचाची भात
तोचि जाणा एक स्मार्ट । मिका म्हणे ॥

यंव करेन त्यंव करेन । वाचाळता निव्वळ क्रियेवीण
त्यास म्हणती धुरीण । मिका म्हणे ॥

उभा द्वारी देवाचिये । लावू शेंडी त्याच्या नावे
जावे त्यांच्याच गावे । मिका म्हणे ॥

आधी कळस मग पाया । ऐसी रचना व्यर्थ वाया
आधी GF मग जाया । मिका म्हणे ॥

## ३४

# शिलेदार!

आपण असता शिलेदार शूर
येवू दे चेव लोटू द्या पूर

जनसेवा हे ब्रीद असू द्या
स्वार्थ आपला गुपित असू द्या

आपण साधे नाही मानव
हाती आपल्या सत्ता दानव

नाही.. चुकलो ..सत्ता देव
आपले आता फुटू द्या पेव

आपण सारे सत्ता पाईक
गडकरी रक्षक आणिक नाईक

नव्या युगाचे आगमन आणि

राखू तळे अन चाखू पाणी

कोण कशाला भितो इथे तो

कानून न आम्हां लागू असतो

लोक प्रतिनिधी आपण असता

कोण दाखवी आडव्या हाता

अखंड मेहनत अशी प्रसिद्धी

अमर्त्य असूदे रिद्धी सिद्धी

ईश लाडके आपण असतो

कोण हात तो लावू धजतो

ईश्वरदत्त स्वकष्टाची सत्ता

कवच कुंडले आपली मत्ता

## ३५

## तळे राखी..

असला जेथे तेथे किस्सा

करू मेहनत घेऊ हिस्सा

फुकट नाही घेत अस्सा

व्यर्थ करिता असला घुस्सा

कुणी म्हणावा मोबदला

कुणी म्हणावे काही

आम्ही नाही करत विचार

मागे आम्ही हटत नाही

आम्हालाही आहे पोट

ही गोष्ट आहे स्पष्ट

हिणवता का उगाच आम्हां

उगा चाटितो थोडे उष्ट!

असती भुते तिथे समजावी शिते

गाऊ नका ती रडगीते

नका म्हणू रे भ्रष्टाचार

हा तर इथला शिष्टाचार

फुका असेे काढिता गळे

नक्राश्रू का ढाळिता बळे

तळे राखूनी पाणी चाखे

कुंपण आमचे शेत खाते

## ३६

## आड-नावे !

वाघ सिंह हाथी लांडगे चितळे
मुंगी कीर पोपट उंदरे झुरळे

कोल्हे घोडे हर्णे बकरे डुकरे
कावळे गाढवे साळुंखे वाघमारे मोरे

एकबोटे द्विवेदी त्रिवेदी पाचपुते सातघरे
सात-विसपुते अष्टपुत्रे दहातोंडे नवघरे

बारापात्रे बारटक्के लाखे नवलाखे
द्वादशीवार साठे हजारे सहस्त्रबुद्धे संख्ये

गोरे घारे पांढरे निळे काळे
भुरे हिरवे जांभळे पोवळे ढवळे

येडेकर शहाणे भोळे बोले बर्वे

भोईर घरत परब समेळ कर्वे

सामंत विचारे डाके ढोले पिसाळ

कुलकर्णी जोशी राणे सावंत धुमाळ

लोखंडे तांबे पितळे जस्ते चांदेकर

खडसे फडके वडके तिडके बांदेकर

देशमाने देशमुख देसाई देशपांडे

माने सरदेसाई सरदेशपांडे पांडे

सोनार शिंपी सुतार कुंभार वंजारी

लोहार पुराणिक वैद्य कासार रंगारी

फडणीस फडणवीस पारसनीस

जमेनीस हजरनीस हसबनीस

डोळे डोके पोटे मानकर कवळी दाते

धोटे थोटे मोटे खरे खोटे भाटे घाटे ताटे

मोगरे  सोनटक्के चाफेकर फुले

दंडवते डांगे पुरोहित कुबेर घुले

श्रीखंडे भेंडे मुळे तांदळे दूधभाते जोंधळे

आंबेकर फणसे दहिफळे ढोबळे भोपळे

सोमण सोमणे बामणे ढोमणे मायदेव

रिसबूड आठवले नाईक पै घोडदेव

म्हात्रे धोत्रे पित्रे पात्रे गणात्रे अत्रे

खर्डे बेर्डे बुर्डे सावर्डे गांगुर्डे शिंत्रे

खारकर भडभडे जमदग्नी आगलावे

एकाहून एक असती 'असली' आड-नावे

## ३७

# नवरा बायको!

नवरा :

कस्ली  ही बैको

सतवते कायको

खाली ऑर्डर देनेका ना

उगाच फसवती कैको

पायजे तिला ते काय

आपण काय देणार नाय ?

आडून आडून विचारते

अशी गंडवते ही बाय

तिच्या शब्दाच्या

का बाहेर हाय

अशी आपली

का हिम्मत हाय

उगा नाकाला जीभ

याला विचारते कोण..

पुरवायची नाय !

बायको :

असला कसला नव्रा हा

उगाच दाखवतो वट

याला कसलाच नाही फरक

मी किती केली वटवट

याला वाट्टे मी

सोडतेच ऑर्डर नुस्ती

उगाच खाई डोके

कसली आहे याला मस्ती

माहिती नाय का याला

घराचा बॉस कोण

मी नाय पाह्यले तर

वैतागले मी याचे

लाडबिड करून करून

टिकून आहे याच्याबरोबर

फक्त मी आहे म्हणून

३८

## मूषकागमन

काय करावे कसे करावे
काही काही कसे कळेना
कुठे लपावे कुठे छपावे
काही काही कसे कळेना

कुठून अचानक कोणी घुसला
पाऊल घसरत धाव धावला
कसा नि कुठूनी आला आतून
कुणा कसा ना कसा तो दिसला

येऊ लागला रव खुडबुड खुडबुड
की दातांनी कुरतड कुरतड
इकडे खुडबुड तिकडे लुडबुड
कुर कुर कुर कुर कुरतड कुरतड

दिसू न दिसे ही चाहूल कुणाची
कसली न खूण दिसे कुणाची
खडबड पडझड झाली डब्यांची
कुरकुर कूरकूर ये कशाकशाची

घरातून त्या पसरे अचानक
भीती कशाची तीही अनामिक
दिसू लागला तो खलनायक
काळा काळा तो मूषकनायक

अर्ध वीताचा .. गणेशवाहक !

## ३९

# उंदराचे गाणे

घरात घुसल्या उंदराची

खुडबुड खडबड खुडबुड खडबड

एकच रव येई असा कि

इकडेतिकडे कुरतड कुरतड

बघून त्याला सर्वांची होई

तडतड चरफड तडतड चरफड

लांबपुच्छधारी तो बघून वाढे

हृदयाची ती धडधड धडधड

सगळीकडे एकच माजे

गोंधळ गडबड गोंधळ गडबड

घालव उंदीर घालव घालव

एकच रडरड एकच बडबड

घेऊन हाती छडी मी केली

इकडे खुडबुड तिकडे खुडबुड

सामानात असा लपे तो

इकडे अडनिड तिकडे अडनिड

चल जा गुपचुप केली ओरड

वदनी वदलो हडहड हडहड

चपळाईने उंदीर पळे तो

प्रयत्न सारे भाकड भाकड

मामा ना तू? का छळतोस?

मोठ्याने म्हणालो,भडभड भडभड

त्या मूषकाने भांडी पाडली

होई रव तो गडगड गडगड

मूषकराजा ना माने तो

चपळाईने पळे तो घडघड घडघड

याच्यापुढती हात टेकले

कधी रे जाशी तडफड तडफड

आता उंदीर राहेच घरी तो

सदस्य जणू तो धाकड धाकड

आता न करमे त्यावीण जर

ऐकू न ये खुडबुड कुरतड

पाळीव जाहला मूषकराजा

घरभर करतो लुडबुड लुडबुड!

४०

## काव्य दंगल!

शब्दांचे उघडूनिया कोश
करशी तू असली कविता..
ऐकून होई खुश वाटे
तुज बबिता किंवा सविता?

आकाशीचे तोडिन म्हणतोस
सूर्य चंद्र ग्रहगोल तारे
वाचीत असता कविता
वाहतील गडे ना वारे ..

वाऱ्याच्या  गोष्टी तुझ्या त्या
खऱ्याखुऱ्याच असती
उडतील काव्य फवारे
कारंजी थुईथुई उडती

ऐकताच  तुझ्या त्या कविता

मी होऊन जाईन दंग

गालावरूनी उडती माझ्या

ते आगळेच रंग

ऐकताच कविता साऱ्या

वाहू लागती वारे

कानातून एका जाती

दुसऱ्यातून बाहेर कारे?

या वाऱ्याची सांगतोस गडे तू

असली गोष्ट ती असली

क्षणी होते काव्य दंगल

होई एकच हड्डी फसली!

## ४१

# तारूण्य!

जेव्हा तुझ्या बटांना
तू लाविलास डाय
क्षणी काळ थांबेल असले
तुज वाटले की काय?
दातांची लावून कवळी
दाखविशी तू काही
दाखवायाचे दंत तुझे ते
तुज वाटती का भारी?
नाही मान्य तुजला
काळाचा कसा प्रकोप
पकडून तारूण्यास
राहण्या कसे प्रताप..
वाटे बाह्य रूपाने
राहशील तू तरूण
समजून घे जरा तू
दिसशी उगा करूण
हा वरवरी अट्टहास

का तारूण्याचा जश्न

आतून काय वाटे

हा लाखमोलाचा प्रश्न

गेले दिन ते गेले

त्यांना तसेच स्मरून

मनातून का न राहशी

तू रे सदा तरूण?

४२

## इतकेच मला ते कळले..

इतकेच मला ते कळले वळणावर जाता जाता
सिग्नल लालच होता समोरी हवालदार ही होता..

हाताने त्याने तेव्हा केलाच इशारा होता
इशाऱ्यातच त्याच्या तेव्हा काहीसा दरारा होता..

शिट्टीत त्याच जोषाने फुंकीत हवा तो होता
वय त्याचे किती असेना शिट्ट्या तो फुंकीत होता..

झटक्याने थांबलो मी निरूपायच माझा होता
गाडीच्या वेगा वरती 'ब्रेक'च न माझा होता..

तो हवालदार हाती मोठे पुस्तक घेऊनी होता
शिकार गाठली त्याचा आनंद आननी होता..

भरण्यास दंड सरसावलो तो त्या तयार न होता
सावज मी गवसलो.. सोडण्याही तयार न होता..

न फाडे पावती पण पाळीत नियम ही होता
या स्टेशनात आमुच्या.. आग्रहच त्याचा होता..

रूल असती कडक इथले असले तो सांगत होता
कळले ते इशारे मजला तो काही मागत होता..

चाले पावतीविना ही असल्या नियमात बसवीत होता
नोटे कडे हिरव्या तो नजर लावूनी होता..

कळले मला इशारे मी श्वास सोडिला होता
दंडावर होई सुटका निश्वास टाकिला होता..

इतुकेच मला ते कळले वळणावर जाता जाता
पैशाने होई सुटका परिणाम नोटेचा होता..

४३

## गतिमान कारभार!

गतिमान कारभाराची

पडे आम्हा भूल

नदी असो वा नसो

बांधू तिच्यावर पूल ..

आधी अंमल मग निर्णय

वाळण्याच्या आधी शाई

करू विचार नंतर आम्ही

आम्हा सगळ्याची घाई..

देऊन टाकू आधी आदेश

टाका संदेश पाठवून

झाला जर विरोध बिनडोक

तरी टाकू तो बदलून..

आधी आमच्या जे होते

त्यांची  चाल कासवाची
गोष्ट नका सांगू आम्हा
ती कासव आणि सशाची..

कासवाच्या चालीची
गोष्ट जुनी झाली काल
गतिमान कारभार
हीच असे आमची ढाल!

४४

## मानव चालिसा..

कोणी कातर हरिण असे अन

लबाड कोणी कोल्ह्यापरी

चित्त्यासम चपळ कुणी असे

कुणी गतीमंद कूर्मगती परि .. ४

चंचल चित्त कुणी भ्रमर जसा

कुणी बकध्यानी एकाग्री

मुंगी सम कुणी संतत कार्ये

कुणी अस्वलासम आलस्य करी .. ८

कुणी लांडग्या सम हिंस्त्र तर

शेळी सम कुणी ममताळू

कुणी करी पोपटपंची तर

चिमणी सम कुणी लाजाळू .. १२

गोमातेसम गरीब कुणी असे

काक दृष्टीचा दुष्ट कुणी

कोकिळकंठी कुणी असे तर
कर्कश्श भसाडा वराह कुणी .. १६

मयूराचे सौंदर्य कुणाला
घुबडासम विद्रूप कुणी
शार्दूला सम शूर लढतसे
सशासम भित्रा ही कुणी .. २०

गिधाड होऊनी कुणी भटके
खाई मृता टाळूवर लोणी
कुणी कुत्र्यासम स्वामीनिष्ठ
अलग दुर्मीळ दावीत पाणी .. २४

जिकडे लोणी मर्कट तिकडे
मारत उडी कोलांटी
दे जो तो मालक आपला
काना मात्रे संग वेलांटी .. २८

कुणी उठून प्रात:काळी
मधुर कूजना रव तो करी

कुणी निशाचर वटवाघूळ
बनून रात्री राज्य करी .. ३२

घारी सम कुणी तीक्ष्ण दृष्टीने
लक्ष्य आपले गाठतसे
कुणी आयती शिकार गाठून
चिरफाडूनिया खात असे .. ३६

निसर्ग आपला विसर्ग करतसे
विविध गुणी  .. नानाविध प्राणी
असा निपजूनी पुरून उरतसे
अतरंगी बहु मानव प्राणी .. ४०

## ४५

## आमचे गाव!

काय कसं काय ..

फाटकात पाय ..

इकडून आय ..

तिकडून जाय ..

जाऊन जाऊन

करणार काय..

माऊ येईल..

खाऊन जाईल साय..

गावचा आमच्या

रूल हाच हाय..

ज्याची लाठी..

म्हैस त्याचीच गो बाय..

गाव आमचा बाय

असलाच हाय ..

अंथरूण हवंय

तर पसरा पाय..

जितपरेंत पाऊल

तितके तुमचेच हाय..

फैलवा पाय..

बघता काय..

लाजू नका उठा चला

पाहताय काय..

लागा कामाला चला

बघताय काय ..

दूध ही तुमचेच नि

तुमचीच साय.. !

४६

## साहेब!

आजारी इतुका न ..
अवघे शंभर ते तापमान
परि कैसा जाईन ऑफिसी..
सुट्टी हेच वर्तमान

खोकलो थोडासा सर्दी
नाकातून लय भारी
दुखऱ्या पाय हात
डोक्याची गोष्ट ही सारी

दुखले थोडेसे थंडी
वाजूनी तापले अंग
कामाचा विचार करता
उडे चेहऱ्याचा रंग

मी असता म्हणतो
काय कामाचा मी नसे
मी नसता साहेब पदोपदी
कसा अडकुनि बसे?

करण्याची कामचुकारी
जणू हौस मज भारी
साहेब कामसू अन
आळशी म्हणे अन्य सारी?

उठता बसता कार्य करिता
करितो पाणउतारा
पगार जरूरी मग
करूच कानाडोळा सारा

तर येता कणकण थोडी
दुखुनि भरूनी अंग

कशास जावे मरत ऑफिसी
मस्त करावे सोंग

असता जर खरे सांगतो
बॉस .. खराखुरा तो
त्याच्या अन कामासाठी
नसतो का धडपडलो?

त्याहून बरे ते सुट्टीचे
घ्यावे लिहून  वैद्याकडूनी
आठवे .. मारिल्या होत्या
दांड्या कशा शाळेमधूनी!

खरे सांगतो असा मी
धन्यवाद साहेबा देतो
त्याच्याच कारणे बालपणाचा
मज आठव असला येतो!

## ४७

# स्वप्न!

काल म्हणे ...
इलेक्शन एकदा पुन्हा
डिक्लेअर झाली
आणि माझी कल्पनाशक्ती
पुन्हा एकदा जागृत झाली

म्हटले दाखविन यावेळेस
पाणी अंगचे पुन्हा
जाहीरनामे नि आश्वासने
यात कसलाय गुन्हा?

आश्वासने मी देईन असली
लावीन पार मी नैय्या
पटवून देईन असा तुम्हा की
मीच एकच तो खिवय्या

मी न खातो पण असती येथे
खाणारे असे खवय्ये
माझ्याहून का अर्धकणाने
असती ते लढवय्ये

माझ्यासम न दुसरा कोणी
मीच सक्षम मीच सुज्ञ
माझ्या वाचून कोण न तारी
कुचकामाचे ते अज्ञ

फुग्यात घालून हवा विकेन
शब्दांचे बुडबुडे
ताणून मांजा उंच उंच उंच
पतंग अंबरी उडे

स्वप्ने पाहत असली होतो
ठोकीत भाषणे जोमात
भार्या मारूनी ढुशी उठवते

खेचीत उशी जोरात

कसली ठोकता भाषणे
म्हणते झाले हो काय
तुटली अर्धी निद्रा नि घोरणे
हाती राहिले काय

हाय! भंगले ते स्वप्न माझे
बदलत होतो ना देश
अर्धांगिनीमुळे राहून गेला
अर्धवट सगळा त्वेष !

## ४८

## जाहीरनामा

## अर्थात

## यंव अन त्यंव

मी करीन यॅंव

करीन त्यॅंव

करूनच दाखवीन

यंव अन त्यंव!

बोलतोच न नुसता

करून दाखवीन

नेऊन ठेवीन

त्यंव अन ह्यंव!

जाहीर नव्हे तो

वचन नामा

दरिद्रतां न वचने

यंव रे यंव!

वचनपूर्तीला

निवडून येणे

असे जरूरी

क्यंव रे क्यंव..!

खुर्ची बघूनी

श्वानही करतो

मांजरवाणी

म्यंव म्यंव म्यंव!

माझे न तसले

ईश्वर योजने

उभा मी आहे

ट्यंव ट्यंव ट्यंव!

वचननामा

सुरस नि सुंदर

कल्पना करा

यंव अन त्यंव!

४९

## अवघाचि संसार..

बोलाचाच असे तिला अधिकार

आपण असावे सदा गप्प

ऐकूनिया घेता सदा सर्वकाळ

का बरे पडेल सारे ठप्प..

कशास रे मना असा अविचार

कशास आर्ग्युमेंट्स करीशी उगाच

हरणे जयाचे विधी ने लिखित

कशास मिरवी तोरा तो फुकाच..

सामोरी आलेले भात नि वरण

समजूनी खावे चिकन मटण

कशास खुमखुमी कशास भांडण

बरे बरे असे मुकाट धोरण..

नाकास का रे पुरवावी जिवणी
घेऊन बसावी मिठाची गुळणी
ठेवून डोके आपल्या ठिकाणी
नपेक्षा घ्याव्या लागती लोळणी

हट्टास असला उगीच पेटून
फुकाचा प्रयत्न वादाचा करी
ऐक रे आता कान उघडून
नसे तुझी बाजी जिंकणारी

हवे संसारी तुज सुख समाधान
एकच मंत्र जप सांज नि सकाळ
अवघाचि संसार मुक्याने करीन
आनंदे भरीन .. तिन्ही काळ

५०

## जुगलबंदी!

अ:

वाळूत मारलेल्या रेघा लाटांनी पुसून नेल्या

अवचित स्वर आला स्मृति जागवित गेला

ब:

स्वर असा तो माझ्या वाम कानी आला

नळी फुंकली सोनारे.. उजव्यातून निघून गेला

अ:

कोणास काय ठावे होतो कुठे कसा मी

आठवणींत त्या कोऱ्या रमलो असा कसा मी

ब:

मजलाच आहे ठावे, आहे असा इथे मी

फडके मारी पोऱ्या.. हाटेलात चहा पितो मी

अ:

सय आज फार येते आवरू हे मन कसे मी

नयनात दाटलेले पाणी ते सावरू कसे मी

ब:

हसू आज फार येते का बरे हसू नये मी

फिदीफिदी हसून माझे का न दंत दाखवू मी

अ:

होती तुझी नि माझी प्रीत ती युगायुगांची

कळले न काय घडले ही रीत या जगाची

ब:

आठवे मला ती शपथ रे तुझ्या शिराची

गडबड गोंधळाची कशी ही रीत रे सदाची

अ:

नयनात येती आसू पण ओठावरी नको ते

हृदयास घरे तुझिया नकोच पाडणे ते

ब:

नळास येते पाणी पण तोटीस का नको ते

बादलीच तुझी गळकी.. नकोच ना भरणे ते

अ:

गझल ही माझी सखये गातो तुझ्याविना मी

हृदयात मी स्वतःच्या प्रतिबिंब शोधितो मी

ब:

खर्च किती तो झाला मोजितो तुझ्यावरी मी

पासबुकात मी स्वतःच्या बॅलन्स शोधतो मी

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे तेविसावे पुस्तक.**

डॉ. नितीन मोरे हे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोगतज्ञ म्हणून लोकसेवा पार पाडत असतानाच कथा, नाटके, लघुनिबंधही लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), नासा येवतीकर(६), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२३ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (६ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१२) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।